RIGHT TO INFORMATION
सूचना का अधिकार

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५१ईमेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक: साशा कार्या/ब-५/contanment zone/रद्द आदेश/करोना-२०२० दिनांक : १८/०५/२०२०.

वाचले:-

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०
७. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/करोना रूग्ण/माहिती/२०२०, दिनांक १२/४/२०२०
८. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/२०२०, दिनांक १२/४/२०२०.
९. या कार्यालयाकडील सुधारीत आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/करोना/२०२०, दिनांक १७/४/२०२०.
१०. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/उरण कन्टोन्टमेंट झोन रद्द/२०२०, दिनांक ०९/५/२०२०.
११. या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि१८/०५/२०२०

---

आदेश,

ज्याअर्थी, उपोद्घातातील अ.क्र. ८ व अ.क्र.९ कडील आदेशान्वये रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील कोटनाका व जेएनपीटी टाऊनशिप येथे प्रत्येकी १ कोरोना बाधित रुग्ण आढळल्याने, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) व प्रतिबंध क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे.

**१. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर- मच्छीमार्केट-उमेश गायकवाड घर-सतिश फोटो स्टुडीओ-शिवप्रेरणा इमारत-राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग व**

**२. जेएनपीटी टाऊनशिप, सेक्टर-२, A ९० ते ९५**

सदर क्षेत्रातील विषाणू बाधित व्यक्तीचे कोरोना टेस्ट अहवाल निगेटिव्ह आल्याने सदर दोन्ही व्यक्तीना रूग्णालयामधून डिस्चार्ज दिला आहे तसेच कंटेनमेंट झोनचा २८ दिवसाचा कालावधीही पूर्ण झालेला आहे.. तसेच कोरोना बाधीत रुग्णाच्या संपर्कात आलेल्या नागरीकांचा समावेश हाय रिस्क मध्ये व लो रिस्क मध्ये करण्यात आलेले होते व त्यानुसार त्यांचेवर वैद्यकीय उपचार चालु होते, त्यापैकी एकूण ३३ हाय रिस्क मधील व्यक्तींची स्वॅब टेस्ट करण्यात आली असुन त्याचा अहवाल निगेटिव्ह आला असल्याने Containment Zone रद्द करणेबाबत तहसिलदार उरण यांनी दि.९.०५.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे.

**सबब वरील वस्तुस्थिती व तहसिलदार उरण यांचे दि.०९.०५.२०२० चे पत्र विचारात घेता, कोटनाका उरण, व जेएनपीटी टाऊनशिप उरण ता. उरण, जि. रायगड येथील कोरोना बाधीत रुग्ण यांचा तपासणी अहवाल हा निगेटिव्ह आला असून रूग्णांना हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला आहे. सदर कंटेनमेंट झोनचा २८ दिवसाचा कालावधीही पूर्ण झालेला आहे. तसेच या व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या अन्य व्यक्तीही आद्याप पर्यंत कोरोना विषाणू मूळे संसर्ग झाल्याचे आढळून आलेले नाही, त्यामुळे मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे Containment Zone (करोना विषाणू बाधीत क्षेत्र) व प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले १. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर- मच्छीमार्केट-उमेश गायकवाड घर-सतिश फोटो स्टुडीओ-शिवप्रेरणा इमारत-राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग व २. जेएनपीटी टाऊनशिप, सेक्टर-२, A ९० ते ९५ ता.उरण, जि. रायगड हे क्षेत्र/परिसर Containment Zone व प्रतिबंधीत क्षेत्रातून वगळण्याबाबतचे आदेश देत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्षक, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

— सही —

**(निधी चौधरी)**
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड**